# .सुप्रशासनासाठी नवीन दृष्टीकोन

प्रशासनाचा सर्व संपूर्ण आधार मनुष्याच्या मनोवृत्तीवर असतो. जसे विचार असतील तसेच प्रशासन असेल. मनुष्याचे मन हे विविध प्रकारच्या विकृतीने प्रदूषित आहे. त्याला शुद्ध आणि सशक्त करण्याची आवश्यकता आहे. परंतु त्यासाठी मनुष्याकडे वेळच नाही. संपूर्ण दिवस तो सांसारिक कार्यामध्येच व्यस्त राहतो. त्याला स्वतःच्या आत्मवलोकन करण्याची आवश्यकता आहे. कामकाजामध्ये त्याचे ८ ते १० तास निघून जातात. उरलेला वेळ सांसारिक गोष्टींमध्ये निघून जातो. मनात किती विचार नकारात्मक आहेत, किती सकारात्मक, किती समर्थ आहेत, किती व्यर्थ वायफळ आहेत याची लिखा-पढी किंवा मनन तो करत नाही. या करीता श्रेष्ठचिंतन, मनन, स्वतःप्रति देखील व नव्या प्रशासनासाठी देखील आवश्यक आहे.

प्रत्येक मनुष्याचे मन हे काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, ईर्ष्या, द्वेष, घृणा, बदल्याची भावना या सर्व गोष्टींनी प्रदूषित आहे. मनुष्य  समजतो की, ही संपूर्ण देण ईश्वराची आहे. कुणीही देवता, ऋषि, महात्मा व सत्पुरूष यांच्या प्रभावातून वाचू शकले नाहीत. शास्त्र, पुराण, इतिहास हे सर्व हिंसक आणि कामुक दन्त कथांनी भरलेले आहे. प्राचीन काळी कधी जास्त तर कधी कमी अशा घटना नेहमीच घडल्या आहेत आणि आतातर कलियुग आपल्या अंतिम सीमेवर आहे. यातून सुटणे असंभव आहे किंवा हे आता लोखंडाचे फुटाणे आल्याप्रमाणे आहे. मोठे-मोठे घोटाळे, रिश्वत यांच्याखेरीज प्रभावशाली संबंधांचा दबाव किंवा धन यांच्या जोरावर गुंड सुटून जातात. प्रशासनिक अधिकारी आणि राजनैतिक नेतादेखील यातून सुटलेला नाही.

सुप्रशासनासाठी आपल्याला आपल्या विचारांमध्ये परिवर्तन करायला हवे. विकृतींच्या शिवाय देखील प्रशासन संभव आहे. एक वेळ अशी होती की जेव्हा भारतात विकृती नव्हत्या, प्रशासन सुंदर, सरळ, सशक्त आणि सतोगुणी होते. मनुष्य विसराळू आहे त्याला त्या काळाचे ज्ञान नाही. स्वर्णिम काळामध्ये हजारो वर्षांपर्यंत एक धर्म, एक भाषा, एक राज्य आणि अनुशासित असे प्रशासन होते. आता आवश्यकता आहे ती एका नवीन दृष्टीकोन स्वीकारण्याची. अवगुणांच्या स्थानावर गुणांचा वापर करा. तुम्ही एक पवित्र महान आत्मा आहात. प्रेम, ज्ञान, सुग-शांति, पवित्रता हे सर्व माझे गुण आहेत. कामाच्या बदल्यात पवित्रता, क्रोधाच्या बदल्यात शांति, लोभाच्या बदल्यात निःस्वार्थीपणा स्वीकारावा. मोहाच्या जागी आत्मिक प्रेम आणि अहंकाराच्या बदल्यात आत्मसम्मानाचा मार्ग आत्मसात करावा. अशा प्रकारे सर्व विकार परिवर्तित होऊन जातील. जसे तुम्ही बनाल तसेच आपले प्रशासन बनेल. यासाठी ‘अटेंशन’ द्यावे लागेल ज्यामुळे संपूर्ण ‘टेन्शन’ समाप्त होऊन जाईल.

तुम्हाला हे ऐकून आश्चर्य होईल की दुनियामध्ये एक असे संघटनदेखील आहे की जेथे पवित्रता आणि मुल्यांच्या आधारांवर संपूर्ण कार्य चालते. जिथे प्रशासन नाही तर ‘प्रिय शासन’ आहे. प्रेम आणि शांतीच्या आधारावर सर्व कर्मचारी व अधिकारी हे अनुशासित आहेत. जिथे कसल्याही प्रकारचे गुप्त अभिलेख लिहले जात नाहीत. जिथे कुणाच्या नावावर, कुठले बँक बॅलेंस नाही, कुणाच्या नावे अचल संपत्ती नाही, इशाऱ्यानेच संपूर्ण कारोबार तिथे होतो व सदैव दुसऱ्यांची सेवा करणे हे त्यांचे भाग्य समजतात.

ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय संस्थानमध्ये प्रशासनाचा नवीन दृष्टीकोन ठेवला आहे. या संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालयात प्रशासनामध्ये नवीन दृष्टीकोन शिकविले जात आहेत. जिथे ३ हजार भाऊ-माता मानव सेवेसाठी पूर्ण समर्पित आहेत.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com